# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

## माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८ अंतर्गत दाखल तक्रार
## क्र. रामाआ/तक्रार/३९८/२०२१/नाशिक

| तक्रारदार | प्रतिवादी<br>जन माहिती अधिकारी |
|---|---|
| श्री.संतोष पंढरीनाथ पगारे,<br>रा.सर्वे नं.१४०/१-२, घर नं.१७, माऊली सोसायटी, चर्चच्या पाटीमागे, मालेगाव कॅम्प (नाशिक), ता.मालेगाव, जि.नाशिक. | मुख्याध्यापक, झुं.प.काकाणी विद्यालय, भुईकोट किल्ला, मालेगाव, ता.मालेगाव, जि.नाशिक-४२३२०३ |

## सुनावणी दिनांक-२१/११/२०२५

तक्रारदार यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपिल क्र.३३७८/२०१९/नाशिक संदर्भात आयोगाने दि.२३/०३/२०२१ रोजी सुनावणी घेऊन खालीलप्रमाणे आदेश पारीत केले आहेत:-

१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, काकाणी विद्यालये माध्यमिक विभाग, भुईकोट किल्ला, मालेगांव यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २५/०४/२०१९ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामूल्य पुरवावी.

२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, झुं.प.काकाणी विद्यालय, श्री.तुकाराम गजमल मांडवडे व मुख्याध्यापक, रु.झुं.काकाणी विद्यालय, श्रीमती शोभा प्रभाकर मोरे यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक २५/०४/२०१९ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहित मुदतीत तसेच प्रथम अपिलाच्या निर्णयानंतरही माहिती पुरविली नाही, अधिनियमातील कलम ७(१) चे उल्लंघन केले आहे. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २०(१) अन्वये शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी दि.२२/०७/२०२१ रोजी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शस्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

२. तद्नंतर तक्रारदार यांनी दि.२३/०७/२०२१ रोजीच्या अर्जान्वये "जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापकांनी कुटील पध्दतीने चाल खेळून शिक्षक नियुक्ती घोटाळा, शासनाची केलेली फसवणूक उघडकीस येवू नये या स्वार्थी भावनेने माझी दिशाभुल करुन तसेच मला सर्व माहिती ही मे.कोर्टाच्या कामासाठी अत्यंत महत्वाची असतांना देखील जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापकांनी खरी व सत्य असलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापकांनी जाणीवपूर्वक, तसेच मला मानसिक त्रास होईल या उद्देशाने खोटया स्वरुपाची माहिती दि.२२/०७/२०२१ रोजी दिलेली आहे. मी मागितलेली माहिती माझ्या अर्जानुसार नाहीच. तसेच अर्जानुसार कुठलाही प्रकारे संदर्भ लागत नाही. फक्त माझा छळ करण्याचा प्रयत्न करीत आहे. माझ्या अर्जानुसार एकही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती मा.राज्य माहिती आयोग खंडपीठ, नाशिक यांना दिलेली माहिती सत्य व छायांकित प्रत मला मे.न्यायालयाच्या कामकाजासाठी अपेक्षित असून मला दिलेली माहिती व आपल्या कार्यालयात जमा केलेली माहिती ची सत्यता पडताळून पाहण्यासाठी मला अपेक्षित आहे." असे नमूद करुन कलम १८ अंतर्गत तक्रार दाखल केली आहे.

३. तक्रारदार यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या उपरोक्त तक्रार क्र.३९८/२०२१/नाशिक संदर्भात आयोगाने दि.०४/०८/२०२२ रोजी सुनावणी घेऊन खालीलप्रमाणे आदेश पारीत केले आहेत:-

१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, काकाणी विद्यालय माध्यमिक विभाग, भुईकोट किल्ला, मालेगाव यांनी हा निर्णय मिळाल्यापासून ०७ दिवसांच्या आत आयोगाकडील द्वितीय अपिल क्रमांक ३३७८/२०१९/नाशिक वरील दिनांक २३/०३/२०२१ रोजीच्या आदेशानुसार तक्रारदारस दिनांक १६/०७/२०२१ च्या पत्रान्वये माहिती पुरविली असून सदर माहिती उपलब्ध कागदपत्रावरुन सत्य माहिती पुरविली असलेबाबत शपथपत्र आयोगास सादर करावे.

२) तक्रारदार यांनी हा निर्णय मिळाल्यापासून ०७ दिवसांच्या आत आयोगाकडील द्वितीय अपिल क्रमांक ३३७८/२०१९/नाशिक वरील दिनांक २३/०३/२०२१ रोजीच्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १६/०७/२०२१ च्या पत्रान्वये खोटी व दिशाभुल करणारी माहिती पुरविली असल्याबाबत आयोगास शपथपत्र सादर करावे.

४. आयोगाच्या उपरोक्त आदेशानुसार तक्रारदार यांनी दि.१०/११/२०२२ रोजीचे शपथपत्र सादर केले असून त्यामध्ये असे नमूद केले आहे की, मी संतोष पंढरीनाथ पगारे वय ४४ वर्ष धंदा-नोकरी रा.सर्वे नं.१४०/१/२ घर नं.१७ माऊली सोसायटी, चर्चच्या पाठीमागे, मालेगाव कॅम्प ता.मालेगाव जि.नाशिक कारणे सदरच्या शपथपत्र सत्यप्रतिज्ञेवर लिहून देतो की मी वरील ठिकाणी कायम स्वरुपी राहण्यास आहे, तसेच मी माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये, अर्ज काकाणी विद्यालय, भुईकोट किल्ला मालेगांव, ता.मालेगाव, जि.नाशिक येथे दि.२५/०४/२०१९ रोजी दाखल केला होता व सदरच्या अर्जान्वये माहिती मागितली होती परंतु काकाणी शाळेच्या मुख्याध्यापक यांनी कोणत्याही प्रकारची माहिती दिलेली नाही अपिलीय अधिकारी यांनी आदेश देवून सुध्दा माहिती दिली नाही राज्य माहिती आयोग खंडपीठ यांच्याकडे सुनावणी होऊन माहिती देण्याचे आदेश दिले असता सदरील शाळेच्या मुख्याध्यापक यांनी ९६ पानांची(प्रत्यक्षात १०७ पानांची) खोटी व दिशाभुल करणारी माहिती दिलेली आहे. शाळेच्या मुख्याध्यापक यांनी खंडपीठाचा देखील अवमान केलेला आहे. दि.०८/०७/२०२२ रोजी ऑनलाईन सुनावणी झाली असता मी स्वत: आपले ईमेल sicnashik@gmai.com वर १०७ पानांची माहिती दि.०५/०७/२०२२ रोजी पाठविलेली आहे. तसेच दि.२३/०७/२०२१ ऑफलाईन सुनावणीच्या वेळी हि १०७ पानांची माहिती आयोगास दाखविलेली आहे. मी शपथपत्र सादर करतो की क्र.३३७८/२०१९/नाशिक वरील दि.२३/०३/२०२१ रोजीच्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी दि.१६/०७/२०२१ च्या पत्रान्वये खोटी व दिशाभुल करणारी माहिती पुरविलेली आहे. माझ्या अर्जानुसार माहिती दिलेली नाही याबाबत आयोगास सदरचे शपथपत्र सादर करीत आहे. वरील सर्व माहिती ही माझ्या माहिती प्रमाणे खरी व बरोबर असुन ती खोटी अथवा चुकीची निघाल्यास मी भा.दं.वि.कलम १९३,२,१९९,२०० अन्वये होणाऱ्या शिक्षेस पात्र राहील यांची मला संपूर्ण माहिती आहे.

आयोगाने तक्रार क्र.३९८/२०२१/नाशिक संदर्भात दि.०४/०८/२०२२ रोजी सुनावणीअंती पारीत केलेल्या आदेशानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, काकाणी विद्यालये, माध्यमिक विभाग, भुईकोट किल्ला, मालेगांव यांनी आयोगाकडे कोणतेही शपथपत्र सादर न केल्यामुळे याप्रकरणी दि.२१/११/२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असता तक्रारदार उपस्थित होते मात्र जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, काकाणी विद्यालये, माध्यमिक विभाग, मालेगांव अनुपस्थित होते.

५. सुनावणीदरम्यानचा युक्तीवाद व प्रस्तुत नस्तीवरील उपलब्ध कागदपत्रे विचारात घेता, असे दिसून येते की, आयोगाच्या आदेशानुसार तक्रारदार यांनी दि.१०/११/२०२२ अन्वये शपथपत्र सादर केल्याचे दिसून येते. मात्र जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या आदेशानुसार शपथपत्र सादर केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, झुं.प.काकाणी विद्यालय, मालेगाव श्री.तुकाराम गजमल मांडवडे व जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, रु.झुं.काकाणी कन्या विद्यालय, मालेगांव, श्रीमती शोभा प्रभाकर मोरे, यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५चे कलम २०(१) अन्वये शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे.

सबब, प्रस्तूत प्रकरणी आयोग पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, झुं.प.काकाणी विद्यालय (माध्यमिक विभाग) भुईकोट किल्ला, मालेगाव, ता.मालेगाव, जि.नाशिक, श्री.तुकाराम गजमल मांडवडे व तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, रु.झुं.काकाणी कन्या विद्यालय, भुईकोट किल्ला, मालेगांव, श्रीमती शोभा प्रभाकर मोरे, यांनी आयोगाने तक्रार क्र.३९८/२०२१/नाशिक संदर्भात दि.०४/०८/२०२२ रोजी सुनावणीअंती पारित केलेल्या आदेशास अनुसरुन आयोगास कोणतेही शपथपत्र सादर केले नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २०(१) अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा आदेश प्राप्तीच्या ७ दिवसाचे आत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही, असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, झुं.प.काकाणी विद्यालय, भुईकोट किल्ला, मालेगाव, श्री.तुकाराम गजमल मांडवडे व तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, रु.झुं.काकाणी कन्या विद्यालय, भुईकोट किल्ला, मालेगाव, श्रीमती शोभा प्रभाकर मोरे यांनी आयोगाने द्वितीय अपिल क्र.३३७८/२०१९/नाशिक संदर्भात दि.२३/०३/२०२१ रोजी सुनावणीअंती पारित केलेल्या आदेशानुसार लेखी खुलासा सादर केल्याचे दिसून येत नाही. तरी सदर खुलासा आयोगाचे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आंत आयोगाकडे सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा लेखी खुलासा प्राप्त न झाल्यास याप्रकरणी त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहित धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

३) वरील आदेशांसह प्रस्तुत तक्रार क्र.३९८/२०२१/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

जावक क्र.e2४८

09 DEC 2025